# पहिली पदयात्रा

***‘मकसदे सफर का पता नही***

***चल पडे मगर रास्ता नही’***

सुमारे सव्वा लाख वर्षांपूर्वी माणसाचा पहिला मोठा प्रवास सुरू झाला. पण आपण प्रवासाला निघालो आहोत हे त्याचं त्यालाही माहीत नव्हतं. कसं जायचं, कुठे पोचायचं, सारंच अनिश्चित होतं. रस्ता कशाला, पायाखाली साधी मळवाटही नव्हती. मुक्कामाचं ठिकाण ठरवायला जगात कुठेही गाव नावाची वस्तीच नव्हती! वाटेत हिंस्र श्वापदं, कोपलेली पंचमहाभूतं भय दाखवत होतीच! अनवाणी पाय, अंगावर असलंच तर एखादं कातड्याचं धडुतं, सोबत ना शिदोरी, ना नकाशा! वाहन म्हणून ना घोडा होता, ना बैल. चाकही माहीत नव्हतं तर गाडी कुठून असणार? तरीही अन्नाच्या शोधात वणवणत, त्याचं रानघर सोडून तो पाय नेतील तिकडे निघाला होता.

***‘या दगडां फुटतिल जिभा कथाया कथा’***

आदिमानवाच्या त्या खडतर प्रवासाची कहाणी भूतकाळाच्या उदरात गडप झाली होती. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत ते प्रवासवर्णन कुणालाही माहीत नव्हतं. पण निसर्गाने मात्र इमाने इतबारे त्या सगळ्या प्रवासाच्या नोंदी जपल्या होत्या. विज्ञानाची प्रगती झाली. आधुनिक माणसाला कार्बनचं, पोटॅशियमचं वय ठरवणं, thermoluminescence, optical dating वगैरे अनेक नवी तंत्रं अवगत झाली. विज्ञानाच्या संगतीने खरोखरच प्राचीन गुहांमधल्या दगडांना जिभा फुटल्या. त्यांनी किरणोत्सारी कथा सांगितल्या.

मग डीएनएची गूढ लिपी वाचायला संशोधक शिकले. सांगाड्यांच्या हाडांनी हकीगती ऐकवल्या. दातांमधल्या डीएनएने दंतकथांना इतिहासाचा सन्मान दिला. त्या सगळ्या ऐवजातून एक अद्भुतरम्य ऐतिहासिक कादंबरी शास्त्रज्ञांना वाचता आली. भूगोलाच्या इतिहासाची आणि आदिमानवाच्या प्रवासाची गोष्ट सांगणारी कादंबरी!

पृथ्वीच्या भूगोलाला त्याचा स्वतःचा इतिहास आहे. त्या इतिहासातली एक-एक घटना ब्रम्हदेवाच्या घटकेसारखीच लाखो-करोडो वर्षं व्यापते. हिमयुगांचा प्रत्येक हिवाळा हजारो-लाखो वर्षं चालतो. पावणेदोन लाख वर्षांपूर्वीच्या थंडीने जंगलं गोठली, प्राणी गारठले. त्यातून तगू शकले तेच जगले. त्या तगण्याच्या धडपडीत दोन पायांवर चालणाऱ्या मानवसदृशांनी नवे शेलके जीन्स स्वीकारले, उत्क्रांती झाली आणि दीड लाख वर्षांपूर्वी आफ्रिकेत आधुनिक मनुष्यप्राणी जन्माला आला.

हिमयुग भरात असताना दोन्ही ध्रुवांवरच्या बर्फाने विषुववृत्ताकडे मैलोन्‌मैल हातपाय पसरले. त्यासाठी त्याने महासागरांकडून पाणी उसनं घेतलं. साता समुद्रांना ओहोटी लागली. समुद्रपातळीखालची बेटं उघडी पडली. बर्फाने आणि बेटांनी पृथ्वीवरच्या भूखंडांना जोडणारे सेतू निर्माण केले.

हिमयुगाने जंगलातली फळं-मुळं घटली होती. शिकारीसाठी पुरेसे प्राणीही उरले नव्हते. म्हणून माणसांचा एक कळप कशासाठी-पोटासाठी करत समुद्रकाठी पोचला. तेव्हा माणूस मच्छिमारी करून, पाण्यातून लाखाचं धन लुटणारा दर्याचा राजा नव्हता. तो शिकारी-वेचकरी पंथाचाच होता. त्याने किनाऱ्यावरच्या शिंपल्या-चिंबोऱ्या वेचून खाल्ल्या. त्याला 'मम'तेची बाधा नव्हती. हिंस्र पशूंपासून वाचवेल तो निवारा आणि पोट भरेल तो किनारा यांचा तो 'पारधी-शोधी' वृत्तीचा पाहुणा होता. एका ठिकाणच्या शिंपल्या-चिंबोऱ्या खाऊन संपल्या की नव्या शिंपलीकिनाऱ्याच्या शोधात, काठाकाठानेच तो पुढल्या मुक्कामाला जाई. तशा माणसांचा तो कळप रक्तसमुद्राच्या उत्तर किनाऱ्याला पोचला. तिथे त्यावेळी सुवेझ-कालवा नव्हता. सुवेझ-सेतू होता. त्याच्यावरून मनुष्यगट अरेबियाच्या उत्तर भागात गेला.

लंबगोलाकार मार्गाने फिरणाऱ्या पृथ्वीने नेमकी त्याच काळात सूर्याशी थोडी जवळीक साधली होती. तिने लाडिकपणे आपली मानही सूर्याच्या दिशेने झुकवली होती. त्या प्रेमाच्या उबेने अरेबियाच्या त्या भागात कधी नव्हे तो वसंत बहरला होता. आसमंत हिरवा होता. माणसांची ती तुकडी निःशंकपणे त्या हरित-व्यूहात शिरली. काही काळाने

भटकभवानी पृथ्वी सूर्यापासून दूर सरली. ऊब संपली, वसंत ओसरला, हिरवाई लोपून भयाण वाळवंट अवतरलं. परतीची वाटही गोठली. सव्वा लाख वर्षांपूर्वीच्या त्या पहिल्या मानवतुकडीचा त्या हिमव्यूहात अडकून निर्वंश झाला.




***शिंपल्यांच्या कवचांचे ढिगारे***

सुमारे ऐंशी हजार वर्षांपूर्वी दुसरा मानवगट तसाच सागराच्या काठाकाठाने, शिंपल्या-चिंबोऱ्या खात आफ्रिकेहून निघाला. रक्तसमुद्राच्या दक्षिणेला ओहोटीमुळे पायवाट बनली होती. तिच्यावरून माणसांचा जथा सध्याच्या जिबूतीहून एडनला पोचला. सातासमुद्रांच्या ओहोटीमुळे जवळजवळ सलग किनारा चालूच राहिला. त्याच्यावरच्या शिंपल्यांचा पुख्खा झोडत, कवचांचे ढिगारे मागे सोडत किनारयात्रींच्या पिढ्या पुढली दहा हजार वर्षं पुढे पुढे सरकत गेल्या. त्यांनी ओमानहून पर्शियन आखात पार करून इराण गाठला. मग भारताच्या पश्चिम किनाऱ्याचा पाहुणचार घेऊन ते पुढे चीनला आणि इन्डोनेशियाला पोचले. त्या सुमाराला इन्डोनेशिया-ऑस्ट्रेलिया यांच्यामधल्या टिमोर समुद्राची पातळी पार खालावली होती. जेमतेम मुंबईपुण्यायेवढं अंतर

पाण्याखाली होतं. लहान होडग्यांतून किंवा तराफ्यांवरून ती पाणपट्टी पार करणं शिंपलेखाऊंना जमलं.

पुरातन पुरात नोआहच्या होडीतून प्राण्यांच्या अनेक जाती तरल्या. ऐतिहासिक ओहोटीत  मात्र मानवाच्या तराफ्यांवरून एकही प्राणी ऑस्ट्रेलियाला गेला नाही. शिंपलेखाऊंना कुठलाही प्राणी भक्ष्य किंवा भक्षकच वाटे.  त्यांची प्राण्यांशी दोस्तीच नव्हती.




***मानववंशाची  पाऊलवाट***

पोटोबाच्या दिंडीने आफ्रिकेहून निघून, पूर्व आणि दक्षिण धुंडाळत ऑस्ट्रेलियापर्यंत झेंडे रोवले. त्यांच्यातल्या काहीजणांनी अधल्यामधल्या मुक्कामांनाच आपलं बस्तान बसवलं.  त्यांची प्रजा तिथूनच आजूबाजूला फैलावली. दिंडीच्या वाटेत युरोप लागलाच नाही. शिवाय युरोपच्या दिशेला सर्दगोठली वाळवंटं होती. माणूस त्यांच्या वाटेला गेला नाही.

सुमारे पन्नास हजार वर्षांपूर्वी पृथ्वीने पुन्हा सूर्याशी जवळीक साधली.  त्या उबेने नेगेवसारख्या वाळवंटांत 'मऊशार हरिख दाटला' आणि आशियातल्या मानवगटांना

उत्तरायण जमलं. काही तुर्कस्तानमार्गे गेले तर काहीजण सिंधू नदीच्या काठाकाठाने तिच्या उगमापर्यंत जाऊन तिथून उत्तरेला सरकले. पुढल्या काही हजार वर्षांत माणसाची लेकरंबाळं युरोपभर पसरली.

पुन्हा पृथ्वीची लहर फिरली. वसंत ओसरला. पण पहिल्या वसंतव्यूहापासूनच्या पंच्याहत्तर हजार वर्षांत माणसाने सतत प्रगतीच केली होती. आफ्रिकेहून निघाल्यापासूनच्या वीस-तीस हजार वर्षांत तर माणूस अधिकच हिकमती झाला होता. नवा शीतव्यूह भेदायला त्याच्यापाशी अधिक प्रगत आयुधं होती. कडाक्याच्या थंडीत रेनडियर-मॅमथ-अस्वलांची शिकार करत त्याने गुजराण केली.
हिमयुगामुळे समुद्र आटलेलेच होते. सैबेरिया आणि अलास्कामधली बेरिंजची सामुद्रधुनी आटून तिथे कोरडा, बेरिंजिया नावाचा विस्तीर्ण भूखंड उघडा पडला होता. त्या ओहोटवाटेवरून आधी रेनडियर अमेरिकेला गेले. त्यांच्या मागून, 'अरे, अरे रेनडियर' करत, पंचवीस ते बावीस हजार वर्षांपूर्वीच्या अवधीत, माणसांच्या पाच भिन्न टोळ्या त्या नव्या खंडात वेगवेगळ्या वेळी पोचल्या.

सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी वातावरण तापलं, बर्फ वितळलं आणि भरती आली. बहुतेक पायवाटा पाण्याखाली गेल्या. पण त्यापूर्वीच मानवाने जग पादाक्रांत केलं होतं!

हे त्या ऐतिहासिक कादंबरीतलं केवळ प्रवासवर्णन झालं. खुद्द कादंबरीत मानववंशाच्या आदिमायेचं कूळ, तिच्या लेकरांचे निरनिराळे चेहरेमोहरे, त्यांची कुत्र्यामांजरांशी दोस्ती वगैरेंची रहस्यंही उलगडलेली आहेत. जसजसं विज्ञान अधिक प्रगत होईल तसतशा त्या निसर्गबखरीतल्या आणखी छुप्या नोंदी प्रगट होत जातील आणि अद्यमानवाला आद्यमानवाची वाटचाल अधिकाधिक समजत जाईल.

डॉ. उज्ज्वला दळवी

-ujjwalahd9@gmail.com

(दैनिक लोकमतच्या सौजन्याने)